# मराठी शाळांना कसे वाचवायचे

**जॉन कुरियन**
सेंटर फॉर लर्निंग रिसोर्सेस, पुणे

भारतामध्ये, विशेषतः महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत ज्या झपाट्याने शाळांमध्ये शैक्षणिक माध्यम म्हणून मुलांच्या मातृभाषेचा ऱ्हास झाला आहे, ते बघून शिक्षण क्षेत्रातील माझ्या अनेक सहकार्यांप्रमाणेच मी अगदी व्यथित झालो आहे. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवता यावे या लोकांच्या वाढत्या मागणीला पुरे पडता न आल्याने, मराठी माध्यमाच्या शाळांची संख्या उतरणीला लागली आहे- त्यापैकी बऱ्याचशा शाळांचा दर्जा घसरून त्या अतिसामान्य दर्जाच्या शाळा बनल्या आहेत.

शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोनातून बघितले तर मराठी शाळांतून मुलांची भरती आणि त्यांचा दर्जा लक्षणीय रीतीने कमीकमी होत जाणे ही एक महाआपत्तीच ठरेल. मातृभाषेतून शिक्षण घेणे ही मुलांच्या परिपूर्ण शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने एक अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे, त्यामुळे पर्यायाने राष्ट्राच्या आर्थिक आणि सांस्कृतिक विकासावर त्याचा महत्त्वपूर्ण परिणाम होतो याबद्दलचे भरभक्कम पुरावे उपलब्ध आहेत.

देशात 1990 मध्ये झालेल्या आर्थिक सुधारणांनंतर इंग्रजी माध्यमाच्या शाळांची मागणी बऱ्यापैकी वाढली. महाराष्ट्रात ती गेल्या दहा वर्षात मराठी शाळांच्या बदल्यात वाढली. डीआयएसईची (DISE) आकडेवारी दर्शवते की 2002 ते 2011-12 या दशकाहूनही कमी काळात, मराठी माध्यमांच्या शाळांतील भरती 89% पासून 74% पर्यंत घटली, तर इंग्रजी माध्यमांतील शाळांमधील मुलांची भरती 3% इतक्या अल्प प्रमाणापासून 16% पर्यंत वाढली.

अधिक प्रसंगोचित बाब अशी की, वाढत्या प्रमाणात मराठी भाषिक पालक, मराठी माध्यमाच्या सरकारी शाळांतून मोफत किंवा भरपूर सवलत मिळणारे शिक्षण स्वखुषीने सोडून देऊन त्यांच्या मुलांना खाजगी विनाअनुदानित इंग्रजी माध्यमांच्या शाळांत घालत आहेत. 2011-12 मध्ये खाजगी विनाअनुदानित शाळांमधून भरती झालेल्या जवळजवळ 3 लाख मुलांपैकी, 75% हूनही अधिक इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी होते, तर 20% हूनही कमी विद्यार्थी मराठी माध्यमाचे होते.

इंग्रजी माध्यमाची ही मागणी आता फक्त शहरी मध्यमवर्गीय आणि उच्चवर्गियांपुरती मर्यादित राहिलेली नाही. कनिष्ठ मध्यमवर्गातील आणि गरीब स्थितीतील पालकही आता वाढत्या संख्येने इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आपल्या मुलाला घालण्याकरता मोठाले त्याग करायला तयार आहेत, कारण आपल्या मुलाने इंग्रजी माध्यमातील शाळेत शिक्षण घेणे हा त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा आणि यशाचा परवानाच आहे असे ते समजतात. बालशिक्षण हक्क कायद्याअंतर्गत असलेल्या 25% मोफत आरक्षित जागांच्या तरतुदीअंतर्गत गरीब परिस्थितीतील मराठी भाषिक पालक, त्यांना यापूर्वी न परवडणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांत त्यांच्या मुलांना घालण्याचा प्रयत्न करीत आहेत.

शिवाय, समकालीन भारतात गरीब लोकांना सक्षम करणारी अत्यंत महत्त्वाची एक गोष्ट म्हणून प्रथमच इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून घेण्यात येणाऱ्या शिक्षणाचा प्रचार मोठ्या प्रमाणावर करण्यात येतो आहे. इंग्रजी माध्यमातील शाळांतून घेतले जाणारे शिक्षण हे मुलांच्या शैक्षणिक समानतेच्या दृष्टीने महत्त्वाचे असते या कल्पनेच्या फशी पडून, महाराष्ट्र आदिवासी विकास खात्याने आदिवासी जिल्ह्यांत चांगल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याचा आणि त्या वाढवण्याचा आपला मनोदय व्यक्त केला आहे. मुंबई आणि पुणे महानगरपालिकांनी याअगोदरच काही इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या आहेत, आणि या शाळा वाढवण्याबद्दल त्यांच्यावर गरीब परिस्थितीतील पालकांचा वाढता दबाव आहे.

इंग्रजी भाषेचे महत्त्व लक्षात घेता, शाळेच्या पातळीवर इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवणे ही एक महत्त्वाची गोष्ट ठरते. मग, महाराष्ट्र शासनापुढे, इंग्रजी माध्यमाच्या नव्या शाळा भराभर चालू करणे, की आहेत त्या शाळांना इंग्रजी शिकवण्याकरता सुसज्ज करणे यापैकी कोणताही एकच धोरणात्मक पर्याय उपलब्ध आहे का?

जगातील इतर इंग्रजी भाषक नसलेले इतर देश,जे जागतिकीकरण झालेल्या या जगात इंग्रजीचे महत्त्व आपल्याइतकेच जाणतात, ते हा प्रश्न कसा सोडवतात? मुलांना उत्तम शिक्षण देणे आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व यावे, याकरता तेही आपआपल्या भाषांचा त्याग करून, शाळांमध्ये इंग्रजी माध्यमातूनच शिकवण्याकडे वळतात??

जिथे इंग्लंडच्या किंवा इतर देशांच्या वसाहती होत्या अशा काही आफ्रिकन आणि दक्षिण आशियाई देशांचा अपवाद वगळता, यूरोपमधील जवळजवळ सर्व देश, पूर्वीचे सोव्हिएत संघराज्य, दक्षिण अमेरिका आणि पूर्व आशिया यांमध्ये तिथल्या शाळांत शिकवण्याचे माध्यम म्हणून ते स्वतःच्या भाषाच वापरतात. यांत फिनलंड, दक्षिण कोरिया, जपान आणि चीन या देशांचाही समावेश आहे, जिथल्या मुलांनी पिसा (PISA) या माध्यमिक शाळेतील मुलांकरता असलेल्या वाचन, विज्ञान आणि गणित या विषयातील समीक्षात्मक विचारांचे मोजमाप करण्याच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या चाचणीत अद्वितीय यश मिळवलेले आहे.

महाराष्ट्र, उरलेल्या भारताप्रमाणेच, चीनकडून याबाबतीत काही धडे घेऊ शकतो. इंग्रजी माध्यमाच्या शाळा नसतांनाही चीनने 'पिसा'त उत्तम कामगिरी बजावलेली आहे. इतर अनेक देशांप्रमाणेच चीननेही हे ओळखले आहे, की सधन आणि गररीब या दोहोंकरता उत्तम शिक्षण द्यायचे असेल तर ते मातृभाषेतूनच असावे. पण इंग्रजी भाषेतील कौशल्यांचे महत्त्व जाणून, त्यांनी त्यांच्या शाळांतून युद्धपातळीवर दुसरी भाषा म्हणून इंग्रजी शिकवायला सुरुवात केली आहे.

इतरही अनेक दर्जात्मक मुद्द्यांची चर्चा करणे गरजेचे आहे. पण प्रथम आपल्या मराठी माध्यमाच्या शाळांतून युद्धपातळीवर दुसरी भाषा म्हणून इंग्रजी शिकवले पाहिजे. त्याकरता या शाळांतील परिस्थितीचा अंदाज घेणे, ती समजून घेणे गरजेचे आहे. या शाळांतील बहुसंख्य मुले अशा घरांतून आणि पार्श्वभूमीतून येतात की जिथे इंग्रजी क्वचितच कानावर पडते, मग इंग्रजी बोलण्याची गोष्ट तर फारच दूर राहिली. शिवाय त्यांच्या बहुतेक शिक्षकांची इंग्रजी भाषेवरची हुकूमत अत्यंत मर्यादित असते,विशेषतः त्यांचे इंग्रजी संभाषण कौशल्य.

या प्रश्नाच्या शैक्षणिक पैलूंकडे लक्ष न देता, मराठी माध्यमांच्या शाळांतील इंग्रजी सुधारण्याकरता आपण अनेक तात्पुरते उपाय - त्यापैकी बहुतेक अध्यापनाच्या दृष्टीने कच्चे असलेले -अंमलात आणले. अत्यंत साशंक जनतेला त्यांनी त्यांच्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्याची अजिबात गरज नाही हे पटवून देणे हाच त्यामागचा एकमेव उद्देश होता.

या खालावलेल्या परिस्थितीतील मराठी माध्यमांतील शाळांमध्ये युद्धपातळीवर इंग्रजी शिकवायला सुरुवात करण्यामागे उद्देश एकच आहे, की त्यांचे रूपांतर सशक्त आणि भरभराटीत असलेल्या द्वैभाषिक शैक्षणिक संस्थांमध्ये व्हावे, जिथे शाळेच्या आणि वर्गाच्या विविध संदर्भात मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषा तितक्याच परिणामकारक रितीने वापरल्या जातील.

महाराष्ट्र शासनाकडून एका विशेष मोहिम गटाची स्थापना करण्यात यावी. मराठी माध्यमाच्या शाळांतून इंग्रजी शिकवणे आणि शिकणे यात लक्षणीय सुधारणा कशी करावी आणि तिच्या अंमलबजावणीवर देखरेख कशी ठेवावी याकरता उपाय सुचवणे हेच त्याचे एकमेव उद्दिष्ट असेल. आपण जोपर्यंत इंग्रजीवर प्रभुत्व असलेले नवे शिक्षक नेमणे, आणि सध्या काम करीत असलेल्या शिक्षकांचे प्रशिक्षण घेणे या गोष्टींना प्राधान्य देत नाही, तोपर्यंत आहे त्या परिस्थितीत काही बदल घडणार नाही.

अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, शिक्षकांचे प्रशिक्षण, चाचणीच्या पद्धती, नवी पाठ्यपुस्तके आणि पूरक वाचन साहित्य विकसित करून, शिक्षकांना सहाय्य करणे गरजेचे आहे. सध्या आपण मराठी माध्यमाच्या शाळांतून इंग्रजी शिकवण्याच्या आणि प्रशिक्षण देण्याच्या मार्गाने जे काही पुरवतो आहोत ते अत्यंत मर्यादित, अध्यापनाच्या दृष्टीने कच्चे आणि परिणामकारक नसलेले, आणि या कामाला ज्याची खरंच आवश्यकता आहे त्यापासून फारच लांब असलेले असे आहे.

महाराष्ट्रातील शैक्षणिक आणि सांस्कृतिक दर्जाचे भवितव्य शासनात आणि नागरी समाजात आहे. काय पणाला लागले आहे त्याची व्यापकता जाणून घेऊन, या दोघांनी मिळून या कामी लागणारी मानवी, संस्थात्मक आणि आर्थिक संसाधने नियुक्त केली पाहिजेत.